


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १५१, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.१३ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## सत्तेचा माज उतरवण्याची ताकद राज-उद्धव ठाकरेंमध्ये : संजय राऊत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, ठाणे :** आज महापालिका निवडणुकीच्या प्रचारसभांमध्ये दोन महत्वाच्या सभांचा सामना मुंबई आणि ठाणे येथे पाहायला मिळतो आहे. एकीकडे ठाकरे बंधूंची सभा ठाण्यात पार पडते आहे. तर दुसरीकडे शिवसेना शिंदे आणि भाजपची म्हणजे महायुतीची सभा मुंबईत शिवतीर्थ या ठिकाणी पार पडते आहे. काल याच ठिकाणी ठाकरे बंधूंची सभा पार पडली होती. त्यामुळे काल भाजप आणि शिंदे गटावर ठाकरेंनी केलेल्या आरोपांचं मुख्यमंत्री फडणवीस आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे काय उत्तर देणार याकडेही सर्वांचं लक्ष लागलं आहे.



दरम्यान, ठाण्यातील सभेत राज आणि उद्धव ठाकरे यांच्या भाषणांआधी ठाकरेंच्या सेनेचे खासदार संजय राऊत यांनी भाषण केले. यावेळी त्यांनी भाजप आणि शिवसेना शिंदे गटावर जोरदार टीका केली आहे. त्यांनी यावेळी शिंदेच्या सेनेने केलेल्या जाहिरातींवरही आक्षेप घेतला आहे. ते म्हणाले की, ठाण्यातली लढाई जी आहे ही ती निष्ठावान विरुद्ध बेईमान अशी आहे. आणि आजही ठाण्यामध्ये जे बाळासाहेबांनी निष्ठेचं बीज पेरलं ते तसंच्या तसं मला दिसत आहे. काल शिवतीर्थावर आतापर्यंतची महाराष्ट्राच्या इतिहासातली सगळ्यात विराट सभा झाली. त्या सभेत उद्धव साहेबांनी आणि राज साहेबांनी जे तडाखे दिले त्या धक्क्यातून मिंधे फडणवीस अद्याप सावरलेले नाहीत आणि आज ही ठाण्याची सभा आहे.

राऊत पुढे म्हणाले की, मी आज शांतपणे भाषण करतो आहे, मला.शांतपणे काही थोडक्यात काही गोष्टी सांगायच्या आहेत. अजित पवार या राज्याचे उपमुख्यमंत्री आहेत. त्यांनी काय सांगितलं, भारतीय जनता पक्ष हा राक्षस आहे. आम्ही म्हणत नाही. आम्ही म्हटलो तर त्यांचे प्रवक्ते आमच्यावर तुटून पडतात, पण अजित पवार तुमच्या मंत्रिमंडळातला एक उपमुख्यमंत्री सांगतो आहे की भारतीय जनता पक्ष हा राक्षस आहे आणि भाजपची राक्षसी भूक मला पाहवत नाही. भाजपला सत्तेची मस्ती आणि माज आणि नशा आली. माज हा शब्द अजित पवारांचा आहे. आता हा माज उतरवायला उद्धव आणि राज आहेत. आपण त्यांच्या पाठीशी उभं राहिल पाहिजे. माज उतरवण्याचं हत्यार आहे, औषध आहे ते राज आणि उद्धव साहेबांकडे आहे, असा घणाघात संजय राऊतांनी केला आहे.

सध्या एक जाहिरात वृत्तपत्रामध्ये पाहायला मिळते चोरलेल्या धनुष्यबाणाची. जाहिरात कशी आहे, जगणं झालंय छान. कारण धनुष्यबाण चोरलेला. तसं नसून जगणं झालंय छान, कारण तुम्ही चोरलाय आमचा धनुष्यबाण. हा धनुष्यबाण फार काळ तुमच्याकडे राहणार नाही. बाळासाहेबांचं पुण्य फार मोठं आहे. त्यांच्या देव्हाऱ्यातला धनुष्यबाण ज्याने चोरला तो अमित शाहाही राजकारणात टिकणार नाही, आणि हा मिंदे सुद्धा राजकारणात टिकणार नाही बेईमान आणि गद्दारांना इथे स्थान नाही, असंही संजय राऊत म्हणाले आहेत.

**युती कधीपर्यंत टीकणार?**

यावर बोलताना संजय राऊत म्हणाले की, एक प्रश्न मला नेहमी विचारला जातो, उद्धव आणि राज साहेब एकत्र तर आले, पण ही त्यांची युती किती काळ टिकणार, तुम्हाला संपूर्ण जमिनीत गाडेपर्यंत. तुमचा संपूर्ण नायनाट करून महाराष्ट्रामध्ये नवीन पर्व सुरू करेपर्यंत आम्ही एकत्र आहोत, आणि शेवटपर्यंत एकत्र राहू, आपण अशी साथ आणि समर्थन द्या की यांचा टांगा पलटी झाल्याशिवाय राहणार नाही.

## लाडक्या बहिणींना ३००० रुपये मिळणार नाहीत, सरकारला मोठा दणका !

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, मुंबई :** सध्या राज्यात महापालिका निवडणुकीमुळे राजकीय वातावरण ढवळून निघाले आहे. १५ जानेवारी रोजी राज्यात एकूण २९ महापालिकांसाठी मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी रोजी या निवडणुकीचा निकाल लागणार आहे. ही निवडणूक जिंकण्यासाठी सगळेच राजकीय पक्ष पूर्ण ताकदीने प्रचार करत आहेत. सभा, बैठकांचे राज्यभर सत्र चालू आहे. राज्यात सत्तेत असलेला शिवसेनेचा शिंदे गट आणि भाजपा यांच्याकडून आपल्या प्रचारात लाडकी बहीण योजनेचा वारंवार उल्लेख केला जात आहे. एकीकडे प्रचाराची रणधुमाळी चालू असताना राज्यात पात्र लाडक्या बहिणींना थेट ३००० रुपये मिळणार असल्याचे सांगितले जात होते. परंतु आता राज्य सरकारला मोठा दणका बसला आहे. निवडणूक आयोगाने या पैसे वाटपाबाबत सर्वात मोठा निर्णय घेतला आहे.




**लाडक्या बहिणींना किती रुपये मिळणार होते?**

मिळालेल्या माहितीनुसार राज्य सरकार लाडक्या बहिणींना येत्या १४ जानेवारी रोजी एकूण ३००० रुपये देणार होते. डिसेंबर आणि जानेवारी महिन्याचे एकूण ३००० रुपये दिले जाणार होते. १५ जानेवारी रोजी महापालिका निवडणुकीसाठी मतदान होणार आहे. त्याच्या एक दिवस अगोदर लाडक्या बहिणींना ३००० रुपये दिले जाणार होते, म्हणून विरोधकांकडून सत्ताधाऱ्यांवर सडकून टीका केली जात होती. महिला मतदारांना प्रलोभन दाखवण्यासाठीच हे पैसे दिले जात आहेत, असा आरोप केला जात होता. विशेष म्हणजे हे प्रकरण थेट निवडणूक आयोगाकडे पोहोचले होते.

**आता निवडणूक आयोगाने काय निर्णय घेतला?**

दरम्यान, आता या प्रकरणात राज्य निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेतला आहे. सरकारच्या या भूमिकेवर आक्षेप घेतला आहे. राज्य सरकारला लाडक्या बहिणींना जानेवारी महिन्याचे १५०० रुपये देता येणार नाहीत, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे. त्यामुळेच आता लाडक्या बहिणींना १४ जानेवारी रोजी ३००० रुपये न मिळता १५०० रुपये मिळणार आहेत. राज्य सरकारला निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार लाडक्या बहिणींच्या खात्यात फक्त डिसेंबर महिन्याचेच १५०० रुपये टाकता येतील.

## एका घरात मिळून १५ कोटींची ऑफर, काय म्हणाले राज ठाकरे ?

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, ठाणे :** ठाण्यातून शिवसेनेची सुरुवात झाली होती. याच ठाण्यात उद्धव आणि राज ठाकरे यांची सभा झाली. या सभेत राज ठाकरे यांनी महानगर पालिका निवडणूकीत पैशाची कशी आमीष दाखवले जात आहेत त्यांचा उल्लेख केला. ठाण्यातील गडकरी रंगायतनमध्ये उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची सभा झाली. या सभेत राज ठाकरे यांनी सत्ताधाऱ्यांवर आसुड ओढले. राज ठाकरे पुढे म्हणाले की त्या दिवशी नाशिकच्या सभेत बोललो होतो. वेडेपिसे झाले आहेत. एका ठिकाणी एका माणसाने स्क्रुटीनी असते. समोरच्याचा एबी फॉर्म गिळला. दिवस नव्हता. एखादा दिवस मिळाला असता तर वाट तरी पाहता आली असती दुसऱ्या दिवशी एबी फॉर्म



पडेल असे राज ठाकरे यावेळी म्हणाले तर सभागृहात एकच हशा उसळला.

राज ठाकरे पुढे म्हणाले की सोलापूरमध्ये आमच्या माणसाचा खून झाला. विद्यार्थी संघटनेचा शहर अध्यक्ष होता. फॉर्म मागे घेण्यासाठी मारलं. हे कोणतं राज्य आहे. बिनधास्त सर्व गोष्टी सुरू आहेत असेही राज ठाकरे म्हणाले. राज ठाकरे म्हणाले की ,' मला खरं तर म्हणून ती माणसं आणायची होती. पाच पाच हजाराला मतं विकत आहेत. मी फक्त दोन तीन लोकांची नावे घेतो. बाकीची येतील असेही ते म्हणाले.

**एका घरात मिळून १५ कोटींची ऑफर...**

राज ठाकरे पुढे म्हणाले की शैलेश धात्रक, मनिषा धात्रक आणि पूजा धात्रक तिघे उभे आहेत. किती पैशाची ऑफर झाली असेल. कल्पनाही करता येणार नाही. या तीन लोकांना एका घरात मिळून १५ कोटींची ऑफर दिली गेली. मला त्यांना मुद्दाम बोलवायचे होते. ते १५ कोटींची ऑफर नाकारून निवडणुकीला उभे राहिले. १५ कोटींची ऑफर नाकारणारे कुठे आणि पाच पाच हजारात मते विकणारे कुठे. या येथे आपल्या राजश्री नाईक आल्या आहेत. त्यांना पाच कोटींची ऑफर झाली असेही राज ठाकरे यांनी सांगितले.

## शाळेतील पोराच्या हातात नव्या कारचं स्टेअरिंग दिलं

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१२, बुलढाणा :** बुलढाणा जिल्ह्यात एका अल्पवयीन मुलगा कार चालवत असताना भीषण अपघात झाला असून या अपघातात १७ वर्षीय रितेश लहाने या दहावीतील विद्यार्थ्याचा जागीच मृत्यू झाला, तर त्याचे तीन मित्र गंभीर जखमी झाले. ९ जानेवारी रोजी सायंकाळी हा अपघात शेलुद ते शिंदिहराळी फाटा दरम्यान घडला. मित्राच्या घरी कार आणून फिरण्यासाठी गेलेल्या चौघांपैकी एकाचा दुर्दैवी अंत झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, ट्युशननंतर मित्राच्या घरी कार आणली असल्याने फिरण्यासाठी रितेश लहाने, काळे, महाडिक आणि उमाळकर हे चौघे मित्र शेलूद येथील शिक्षक कॉलनीमधून चिखली-खामगाव शिंदिहराळी फाट्यापर्यंत गेले होते. परत चिखलीकडे येत असताना अचानक कारवरील नियंत्रण सुटले. कार रस्त्याच्या कडेला असलेल्या खड्ड्यात उतरून एक-दोन पलट्या घेतल्याने हा भीषण अपघात झाला.

या अपघातात १७ वर्षीय रितेश समाधान लहाने याचा जागीच मृत्यू झाला. त्याचे मित्र महाडिक आणि उमाळकर हे तिघे जखमी झाले आहेत. अपघातग्रस्त वाहनाचा क्रमांक जीजे ०५ सी ९४७९६ असा आहे. अपघाताची माहिती मिळताच शिवसेना कार्यकर्ते आणि नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमींना तातडीने रुग्णालयात दाखल केले.



शवविच्छेदनानंतर रितेशच्या पार्थिवावर त्याच्या मूळगावी काटोडा येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

दरम्यान, रितेश हा आई-वडिलांचा एकुलता एक मुलगा होता. त्याच्या अपघाती मृत्यूने लहाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. रुग्णालयात नातेवाईकांचा आक्रोश हृदय पिळवटून टाकणारा होता. रितेश अत्यंत आज्ञाधारक, मितभाषी आणि प्रेमळ स्वभावाचा असल्याचे परिसरातून सांगण्यात आले. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक हुसे आणि हवालदार कैलास चतरकर करत आहेत. अल्पवयीन मुलांनी गाडी चालवल्यास असे गंभीर अपघात होऊ शकतात, हे या घटनेतून पुन्हा एकदा समोर आले आहे. त्यामुळे अल्पवयीन मुलांनी हा मोह टाळणे गरजेचे आहे.

## मुलाच्या डोळ्यांदेखत वडिलांना निर्घृणपणं संपवलं...

**दि.१२, नागपूर :** घरासमोर शिवीगाळ करीत असलेल्यांना हटकल्याने इसमाची त्याच्या मुलाच्या डोळ्यांदेखत हत्या करण्यात आली. ही घटना शनिवारी मध्यरात्री इमामवाडा पोलिस ठाण्याच्या हद्दीतील कापला वस्ती येथे उघडकीस आली. याप्रकरणी पोलिसांनी तीन आरोपींनी अटक केली आहे.

**नेमकं काय घडलं?**

मंगल भागीया कोरी (वय ५०, रा. कापला वस्ती, इमामवाडा) असे मृताचे नाव असून, रोहन चावरिया (वय ३४), रोहित चावरिया (वय ३२), कुंदन चव्हाण (वय ४९, सर्व रा. कापला वस्ती, इमामवाडा) अशी या प्रकरणातील आरोपींची नावे आहेत. प्राप्त माहिती माहितीनुसार, मंगल कोरी हे मजूर होते. शनिवारी रात्री ते घरी असताना, तिथे रोहन, रोहित आणि कुंदन तिघेही दारू पिऊन आले. मंगल यांच्या घरासमोर उभे राहून शिवीगाळ करू लागले. यावरून मंगल यांनी या तिघांना हटकले. यावरून मंगल यांचा कुंदनशी वाद झाला. दरम्यान, तिथे मंगल यांचा मुलगा शुभम आला. त्याने मध्यस्थी केली असता कुंदनने मंगल यांना झापड मारली. आपल्या वडिलांवर हात उचलल्याने शुभमने कुंदनच्या कानशिलात लगावली. यामुळे हा वाद वाढला. रोहनने शुभमला मारण्यासाठी घरातून लाकडी दांडा आणला. त्याने तो शुभमला मारण्याचा प्रयत्न केला असता, वडील मंगल खाली वाकले. यामुळे दांडा त्यांच्या डोक्याला लागल्याने जबर दुखापत झाली. त्यांना उपचारासाठी मेडिकलमध्ये नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले. ही माहिती इमामवाडा पोलिसांना मिळताच, वरिष्ठ पोलिस निरीक्षक जयवंत पाटील यांनी गुन्हा दाखल केला. रोहन, रोहित आणि कुंदन या तिघांनाही तत्काळ अटक करण्यात आली.

# परस्परांतील स्नेह वाढवणारी 'मकर संक्रांत'

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
संपर्क : ९६६४५५९७८०



असे म्हणतात प्रेमाने जग जिंकता येते. जिथे सर्व शस्त्रांचा प्रभाव संपतो तिथे प्रेमाचे शस्त्र कामी येते. श्रीकृष्णानेही गीतेमध्ये प्रेमाची महती वर्णिली आहे. आपल्या संपूर्ण अवतारकार्यातही भगवंताने प्रेमाचे महत्व आपल्या वर्तणुकीतून प्रसंगांतून दाखवून दिले आहे. भारतीय हिंदू संस्कृतीने तर प्राणिमात्रापासून अगदी निर्जीव वस्तुवरही प्रेम करायला शिकवले आहे. अशा या प्रेमाची शिकवण देणारा वर्षातील पहिला सण म्हणजे मकर संक्रांत. तिळगुळाच्या माध्यमातून प्रेमाची देवाणघेवाण करण्यास शिकविणारी मकरसंक्रांत भारतीय संस्कृतीचे एक आगळे वैशिष्ट्य आहे. या दिवशी सूर्य मकर राशीत प्रवेश करतो म्हणजेच सूर्याचे उत्तरायण सुरु होते. हा काळ अत्यंत शुभ मानला जातो. शरपंजरी पहुडलेल्या पितामह भीष्मांनीही प्राण त्यागण्यासाठी उत्तरायण सुरु होण्याची वाट पाहिली होती. हिंदू धर्मातील हा एकमेव सण आहे जो शालिवाहन वर्षानुसार साजरा न करता सौर कालगणनेनुसार साजरा केला जातो..

भारत हा कृषिप्रधान देश असल्याने या सणाला शेतीविषयक महत्वही आहे. आपल्या शेतात आलेले धान्य या दिवशी सुवासिनी स्त्रिया एकमेकींना वाण म्हणून देतात. याचेच रूपांतर आता हळदी कुंकू समारंभात झाले असून शहरी भागांत स्त्रिया वेगवेगळ्या वस्तू वाण म्हणून देतात. लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत सर्वांना तिळगुळाच्या लाडूप्रमाणे प्रेमाच्या नात्यात घट्ट बांधण्याची प्रेरणा देणारा हा सण स्नेहाचे आणि प्रेमाचे आगळे महत्व सांगून जातो. एकमेकांना तिळगुळ देताना 'आमचा तिळगुळ सांडू नका, आमच्याशी भांडू नका' असे बजावून वर्षभर परस्परांशी स्नेहाने वागण्याचा जणू करारच या दिवशी केला जातो. आमच्या लहानपणी मोठ्यांना तिळगुळ देऊन त्यांचे शुभाशीर्वाद घेताना पाठीवर पडणारी थाप आम्हा बच्चे कंपनीला वेगळाच आनंद देऊन जाई. तिळगुळ वाटूनही तिळगुळाची वाटी द्रौपदीच्या थालीप्रमाणे भरलेलीच असे. कारण जेव्हढे तिळगुळ दिले जायचे तेव्हढेच पुन्हा वाटीत यायचे. तिळगुळ वाटण्याच्या निमित्ताने जेष्ठ मंडळींकडून होणारे लाड आणि मिळणारे आशीर्वाद आम्हाला ऊर्जा देत असत.

तीळ हे स्निग्ध असतात. स्निग्ध म्हणजेच स्नेह. या स्नेहाचे गुळासोबत मिश्रण करून ते घट्ट केले जाते. एकमेकांतील स्नेहाचे नाते असेच घट्ट राहावे यासाठीच मकर संक्रातीच्या दिवशी प्रतीकात्मक तिळगुळ एकमेकांना दिला जातो. तीळ हे उष्ण असल्याने थंडीच्या दिवसांत शरिरातील उष्णता वाढवण्याचे महत्वाचे कार्य करतात त्यासोबत मिश्र केलेला गुळ स्नेहाच्या नात्यातील गोडवा दिवसागणिक वाढत जाण्याची प्रेरणा देतो. मकर संक्रांतीनंतर रथ सप्तमीपर्यंत स्त्रिया घरोघरी किंवा सार्वजनिक ठिकाणी हळदी कुंकू साजरा करतात. एरव्ही एकमेकांशी भांडणाऱ्या, एकमेकांची उणीधुणी काढणाऱ्या स्त्रिया वर्षभरातील सारे हेवेदावे विसरून हळदी कुंकू साजरा करण्यासाठी एकत्र येतात. एकमेकींना हळद कुंकू लावून पस्परांतील शक्तीचे पूजन करतात. प्रेमाचे प्रतीक म्हणून तिळगुळासोबत वाण देतात. मकर संक्रांत हा सण भारताच्या विविध प्रातांसह नेपाळमध्येही उत्साहाने साजरा केला जातो. प्रत्येक ठिकाणी सण साजरा करण्याच्या पद्धती जरी भिन्न असल्या तरी एकमेकांमध्ये प्रेमाची देवाणघेवाण करणे हाच या सणाचा प्रमुख उद्देश आहे. सध्याच्या धावत्या जगात आपल्या पाल्याचा निभाव लागावा यासाठी पालक आपल्या पाल्यांना इंग्रही माध्यमांच्या किंवा कॉन्व्हेंट शाळांमध्ये घालू लागली आहेत. कॉन्व्हेंट आणि इंग्रजी माध्यमातून शिक्षण घेणाऱ्या आजच्या पिढीवर पाश्चात्य संस्कृतीचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झालेला पाहायला मिळतो. प्रेम व्यक्त करण्याचे दिवस आणि साधनेही आज बदलली आहेत. परंपरागत सणांची जागा आज निरनिराळ्या 'डेज'ने घेतली आहे. हातभर रिबिनी बांधून आणि अंगावर पेनाने रंगवून, चॉकलेट आणि गुलाबाची फुले वाटून प्रेम दर्शवणारी नवीन पिढी सर्वत्र पाहायला मिळते आहे. ज्या पिढीमध्ये जेष्ठांसाठी केवळ 'मदर्स डे' आणि 'फादर्स डे' तेव्हढे शिल्लक राहिले आहेत. अशा पिढीला मकरसंक्रांतीतील तिळगुळाचा गोडवा कदाचित कळणारही नाही. त्यांच्यावर आपल्या सणांचे आणि संस्कृतीचे महत्व बिंबवणे आज आवश्यक बनले आहे.

# संसदेत कायदा... सडकेवर पायमल्ली!



नुकत्याच संपलेल्या संसदेच्या हिवाळी अधिवेशनात आरोग्य सुरक्षा-राष्ट्रीय सुरक्षा उपकर विधेयक, २०२५ मंजूर करण्यात आलं. येत्या १ फेब्रुवारीपासून हा कायदा लागू करण्याचा सरकारचा निर्धार आहे. तंबाखू, गुटखा, पान मसाला यांसारख्या पदार्थांवर विशेष उपकर लावून त्याला सिन टॅक्स किंवा 'पाप कर' असं नाव देण्यात आलं आहे. तंबाखूजन्य पदार्थांचं सेवन म्हणजे पाप – असा नैतिक संदेश समाजाच्या कानावर खरंच पडतो, की सरकार आपल्या यंत्रणात्मक अपयशावर केवळ शब्दांची पुटं चढवत आहे, हा खरा प्रश्न आहे.

'पाप कर' ही संकल्पना नेमकी काय? वैयक्तिक आरोग्य आणि समाजासाठी घातक व्यसनांवर अतिरिक्त कर लावण्यामागचा उद्देश फक्त महसूल वाढवणं नसून, लोकांना त्या सवयींपासून परावृत्त करणं असल्याचं अर्थमंत्र्यांनी स्पष्ट केलं. देशात तंबाखू व पान मसाल्यावर आधीच २८ टक्के जीएसटी आहे आणि त्यावर भरपाई उपकर वाढवण्याचा प्रस्ताव आहे. किंमत वाढली, तर वापर कमी होईल, असा दावा केला जात असला तरी वास्तव वेगळं आहे.

खुद्द राजधानी दिल्लीत अनेक शाळा, महाविद्यालयं आणि विद्यापीठांच्या आसपास सिगारेट, गुटखा, ई-सिगारेट खुलेआम विकले जातात. कायद्यानुसार शैक्षणिक संस्थांच्या १०० मीटर परिसरात यांची विक्री बेकायदा आहे; पण ही बंदी कागदापुरतीच. नियम आहेत, फलक आहेत; पण त्यामागे उभं राहणारं प्रशासन दिसत नाही. पाप-पुण्य माना वा न माना, व्यसनाधीनतेचा पहिला बळी किशोरवयीन वर्ग ठरतो. टपऱ्यांवर वयाची चौकशी नाही, ओळखपत्राची मागणी नाही. पकडलं गेलं, तरी जास्तीत जास्त २०० रुपयांचा दंड – तोही रोजच्या खर्चाचा भाग. दंड भरा आणि पुन्हा व्यवसाय सुरू, असं वर्षानुवर्षं चालू आहे. उद्याची पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकत असताना, व्यवस्था मात्र विधेयकाच्या शब्दांवर मोहित झालेली दिसते. पोलिस, महानगरपालिका, शिक्षण व आरोग्य विभाग – सगळे संबंधित; पण जबाबदारी कुणाचीच नाही. एखादी कारवाई होते आणि काही दिवसांत सगळं पूर्ववत. केवळ उपकर वाढवून काय साध्य होणार? आपल्याकडचा पूर्वानुभव असा की, करवाढ आवश्यक असली, तरी अपुरी ठरते. दारूबंदी असलेल्या राज्यांत बेकायदा व बनावट उत्पादनांचा बाजार फोफावतो; ती अधिक स्वस्त आणि अधिक घातक ठरतात. देशात शालेय-महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या किमान ३०–३२ कोटी आहे. 'दिल्ली एम्स'च्या मदतीने 'नॅशनल मेडिकल जर्नल ऑफ इंडिया'मध्ये प्रसिद्ध झालेल्या सर्वेक्षणानुसार अनेक मुलांमध्ये वयाच्या १२-१३ वर्षांपासूनच सिगारेट, तंबाखू, गांजा, बीअर ते 'पेग'पर्यंतचा प्रवास सुरू होतो. सुमारे १५.१ टक्के विद्यार्थ्यांनी किमान एकदा तरी आणि १०.३ टक्के विद्यार्थ्यांनी सतत व्यसन केल्याचं कबूल केलं आहे.

या वास्तवात ई-सिगारेट किंवा व्हेपिंगचा धोका अधिक सूक्ष्म आणि अधिक घातक आहे. 'धूर नाही, त्यामुळे धोका नाही' हा गैरसमज पद्धतशीरपणे पसरवला गेला. आकर्षक रंग, विविध फ्लेवर्स, आधुनिक गॅजेटसदृश डिझाइन आदींमुळे ई-सिगारेट व्यसन न वाटता फॅशन वाटू लागली. प्रत्यक्षात अनेकदा त्यातील निकोटिनचं प्रमाण पारंपरिक सिगारेटपेक्षा अधिक असतं. किशोरवयीन मुलांवर याचा परिणाम दीर्घकालीन असतो. कायदा असूनही ई-सिगारेटची ऑनलाइन विक्री, कुरिअरद्वारे घरपोच पुरवठा आणि सोशल मीडियावरील अप्रत्यक्ष जाहिराती हे सुरूच आहे. लोकसभेतलं व्हेपिंग जगाला दिसलं, पण आज शाळेच्या दप्तरांमध्ये पुस्तकांबरोबर व्हेपिंग धुरकांडं जातंय, हे वास्तव आहे. जागतिक आरोग्य संघटनेने नुकताच प्रकाशित केलेला अहवाल सांगतो, की किमान १३ ते १५ वर्षांवरील १५ दशलक्ष किशोर-किशोरींनी ई-सिगारेट/व्हेपिंगचा वापर केला आहे, आणि जगभरातील उपलब्ध डेटांमध्ये तरुण लोक व्याप्तीने व्यसनाच्या अधिक धोक्यात आहेत. किशोरवयीन वापरकर्ते प्रौढांच्या तुलनेत नऊपट जास्त व्हेपिंग करतात. ई-सिगारेटचा वापर केल्याने किशोरवयीन मुलं पारंपरिक सिगारेटकडे वळण्याची शक्यताही वाढते, असंही अनेक तज्ज्ञ अधोरेखित करतात. व्यसनांनी आता पारंपरिक तंबाखूच्या पुढे पाऊल टाकलं आहे ते डिजिटल दिशेनं. अल्पवयीनांमध्ये त्याचं प्रमाण ठळकपणे वाढलं आहे. समाजाला आणि राष्ट्रीय आरोग्य यंत्रणेला याचा गांभीर्याने विचार करणं भाग आहे. उपकर लावून प्रश्न सुटत नाही; इथे कठोर देखरेख, डिजिटल नियंत्रण आणि शालेय पातळीवर जनजागृती हवी. पण त्या दिशेने ठोस पावलं पडताना दिसत नाहीत.

संसदेत कायदे मंजूर होतात आणि सडकेवर त्यांची पायमल्ली होते. 'पाप कर' लावून जबाबदारी संपल्याचा समज सोपा; पण त्या पापाची किंमत उद्याची पिढी मोजते आहे व्यसनाधीन शरीर, हरवलेलं भविष्य आणि ढासळती आरोग्य व्यवस्था. सिगारेट, गुटख्यापासून अमली पदार्थांच्या 'पापा'च्या विषारी विळख्यात अडकणाऱ्या पिढीचं रक्षण व्हायला हवं. तुकोबा म्हणतात, 'पापाची वासना नको, दावू डोळा त्याहुनी आंधळा बराच मी.' संतांचे अभंग बऱ्याचदा सामाजिक त्रुटींवर नेमकं बोट ठेवतात. वर्तमान मुद्द्यांवर, व्यसनाधीनतेच्या विळख्याचं सामाजिक पाप दिसत असूनही डोळेझाक करणं म्हणजे डोळस आंधळेपणाच. याबाबत धोक्याचे इशारे वारंवार मिळूनही कायदा केल्याच्या समाधानातली व्यवस्था हलली नाही, तर नवा 'पाप कर' हा नैतिक संदेश न राहता आपल्या सामूहिक अपयशाचं प्रतीक ठरेल.

# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला.....!!



भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो.

आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो.

एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात.

मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## सोडा पाठ

काही पापे हटवादी
सोडत नाहीत पाठ
जिथे जाई तिथे येई
लगो लग पाठो पाठ

धुतले ना जाती डाग
अधिकचं गहिरे दाट
अडकून पडे सहज
भ्रम जंगला घनदाट

सुटाया जंजाळातूनि
यत्नकरे सत्राशेसाठ
पुन्हा खारटसागरात
उसळून उन्मळे लाट

नशिबा काय वाढले
तपासून पाहे ललाट
गाडी ना पोचते कुठे
बदलत राही फलाट

मना दडला आरोपी
सैरभर फिरे मोकाट
मान्य करेना रे गुन्हा
भ्रमिष्ट झाला सैराट

काय वाढून ठेवलेयं
माहित ना पुढे ताट
आश्चर्य चकावे मला
पापण्या होतात ताठ

धर्मकांड कैक केले
वाचे ग्रंथ शक्ति पाठ
पश्चात्ताप नाहीकेला
डोक्यात भरलामाठ


**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

# नवचैतन्य देणारा, भारतीय कृषीसंस्कृतीतील मकरसंक्रात

## वाचक पत्र

मकरसंक्रांत हा भारतातील पौष महिन्यात येणारा एक शेती संबंधित सण आहे. सौर कालगणनेशी संबंधित असा हा महत्त्वाचा भारतीय सण आहे. भारतीय संस्कृती ही कृषी संस्कृती आहे. या दिवसांमध्ये शेतीमधील आलेल्या धान्याचे वाण एकमेकांना स्त्रिया देतात. हरभरे, ऊस, बोरे, गव्हाची ओंबी, तीळ अशा गोष्टी सुगडात भरून त्या देवाला अर्पण करतात महिला उखाणे घेतात ठिकठिकाणी हळदी कुंकू कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

हा सण जानेवारी महिन्यात व हिंदू पंचांगाप्रमाणे पौष महिन्यात येतो. संक्रांत ही एक देवता मानली गेली असून प्रतिवर्षी ती येताना वेगवेगळ्या वाहनावर बसून येते अशी समजूत प्रचलित आहे. कधी तिचे वाहन हत्ती, कधी गाढव तर कधी डुक्कर असते आपल्या महाराष्ट्रात प्रत्येक सण साजरा होतांना अतिशय उत्साह, आनंद, एकमेकांना मान सन्मान देण्याची पध्दत, रूढी परंपरा यांना फार महत्व दिल्याचं आपण पाहातो. या परंपरा सुरू झाल्या त्यामागे देखील पुर्वजांचा एक चांगला हेतु असल्याचे लक्षात येते. मकरसंक्रात सणापुर्वी वातावरणात कमालीचा गारठा असतो प्रत्येक सजीवाला या थंडीची हुडहुडी फार गारेगार करून सोडते. कधी एकदा सुर्य तापतोय आणि ही थंडी कमी होते असे प्रत्येकाला वाटते. आणि हा सुर्यदेव तापायलाच तयार नसतो तो तयार होतो ते या मकर संक्रांत भारताच्या विविध राज्यात विविध नावाने आणि विविध पद्धतीने साजरी केली जाते जसे मकरसंक्रात महाराष्ट्र, पोंगल तामिलनाडु, उत्तरायण गुजरात व



राजस्थान, लोहढी पंजाब, माघमेला ओडिसा, भोगाली बिहु आसाम... संक्रांती कर्नाटक, केरळ, आंध्रप्रदेश, बिहार अशी विविध नावं या सणाला आहेत. प्रत्येक धर्म आपापल्या प्रथांप्रमाणे या दिवसाला साजरा करत असले तरी देखील आनंद, उत्साह, जल्लोष हा सगळीकडे असतो मकरसंक्रांत या सणाचे आणखीन एक वैशिष्ट्य म्हणजे हा सण कायम १४ जानेवारीलाच येतो कधीतरी या सणाला १३ जानेवारी किंवा १५ जानेवारीला आल्याचे आपण पाहातो पण ही अपवादात्मक स्थिती सोडल्यास हा उत्सव नेहमी १४ जानेवारीला येतो पौष महिन्यात जेव्हां सुर्य मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा हा उत्सव सर्वत्र संपन्न करण्याची परंपरा आहे.

हा भारतीय सण सौर कालगणनेशी संबंधीत अतिशय महत्वाचा सण असून शेतीशी देखील संबंधीत आहे. मकरसंक्रांतीपासुन हळुहळु दिवस मोठा होत जातो आणि रात्र लहान होत जाते. सुर्याची तीव्रता दाहकतेत बदलत पुढेपुढे सरकायला लागते आणि थंडीची तीव्रता कमी व्हायला मदत होते हिचं मकरसंक्रांतीची जादू आहे !

**– राजू जाधव**
**मांगूर जि.बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### पारनेर येथे सोयाबीन केंद्रांचे उदघाटन



**अक्षराज : राजकुमार इकडे**
**दि.१२, सुपा (अहिल्यानगर) :** दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी पारनेर येथे पारनेर तालुका खरेदी विक्री संघाच्या वतीने शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या सोयाबीन केंद्राचे उद्घाटन समारंभ महाराष्ट्र राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील तसेच सुजित झावरे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली पंचायत समिती सभापती गणेश शेळके, बाबासाहेब तांबे, विश्वनाथ कोरडे, राहुल शिंदे, दिलीप दाते, अश्विनीताई थोरात, सुनिल थोरात, सतीश पिंपरकर, वसंतराव चेडे, बाळासाहेब पठारे, अशोक सावंत, खरेदी विक्री संघाचे चेअरमन, व्हा.चेअरमन व संचालक मंडळ व मान्यवर मंडळी यांच्या उपस्थिती संपन्न झाला.

### राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकाणंद जयंतीनिमित्त विविध कार्यालयात साजरी



**अक्षराज : अशोक लोणीकर**
**दि.१२, मुखेड (नांदेड) :** मुखेड तालुक्यातील मुक्रमाबाद येथील शासकिय, निमशासकिय, शाळा, महाविद्यालयात सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी जि.प.शाळेत शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष अशोक लोणीकर व चव्हाण, कुलकर्णी, शेळके श्रीमती पाटील यांच्या हस्ते प्रतीमेचे पुजन करुन पुष्पहार अर्पण करण्यात येऊन जयंती साजरी करण्यात आली. तर कै.डॉ.भाऊसाहेब देशमुख विद्यालयाचे मुख्याध्यापक मोरे बी.एस. यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून व शीफळ फोडून जयंती साजरी करण्यात आली. तसेच शाळेचे प्रवेक्षक घोनसीकर यांनी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विद्यार्थ्यांना जीवनकार्याची माहिती सांगितली. या कार्यक्रमास शाळेचे विद्यार्थी विद्यार्थिनी व शिक्षक वर्ग उपस्थित होते.

### खापरखेडा पत्रकार संघाच्या अध्यक्षपदी सुनील जालंदर यांची बिनविरोध फेरनिवड



**अक्षराज : दिवाकर घेर**
**दि.१२, नागपूर :** नागपूर जिल्हा मराठी पत्रकार संघाशी संलग्न असलेल्या खापरखेडा पत्रकार संघाची निवडणूक रविवार, दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी अत्यंत उत्साही वातावरणात पार पडली. निवडणुकीत सुनील जालंदर यांची अध्यक्षपदी सलग दुसऱ्यांदा बिनविरोध फेरनिवड करण्यात आली आहे. संघाच्या कार्यकारिणी निवडीसाठी आयोजित विशेष सभेत सर्व पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने करण्यात आली. ज्यामुळे खापरखेडा पत्रकार संघात असलेले ऐक्य पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. नव्या कार्यकारिणीत अध्यक्ष सुनील जालंदर, कार्याध्यक्ष क्रिष्णा नमलेवार, सचिव अभय मिश्रा, उपाध्यक्ष कपिल वानखेडे, राजेश खंडारे, कोषाध्यक्ष गिरधारी शर्मा, सहसचिव मयूर तिरपुडे, विनोद गोडबोले यांची निवड करण्यात आली. यावेळी खापरखेडा पत्रकार संघाचे सदस्य व ज्येष्ठ मार्गदर्शक दिवाकर घेर, अमर जैन, डॉ.अहमद शेख, राहुल तिवारी आणि डॉ.विनोद गौतम, मनोज डेव्हिड, केशव पानतावणे, सुरेश वानखेडे, श्रीराम सातपुते, शुभम आदी वाकपांजर, विक्की थापा उपस्थित होते. अध्यक्षपदी फेरनिवड झाल्यानंतर सुनील जालंदर यांनी सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले. पत्रकारांच्या समस्या सोडवणे आणि संघटनेची ताकद वाढवणे ही आपली प्राथमिकता राहील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. खापरखेडा पत्रकार संघाच्या नवनियुक्त पदाधिकारी व सदस्यांवर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.


### व्ही.पी शैक्षणिक संकुलात राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद जयंती साजरी



**अक्षराज : विकास वाघ**
**दि.१२, धाराशिव :** व्ही.पी.शैक्षणिक संकुल, छत्रपती संभाजीनगर रोड, धाराशिव येथे डॉ.प्रतापसिंह पाटील व करण प्रतापसिंह पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.कार्यक्रमाची सुरुवात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून करण्यात आली.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी राजमाता जिजाऊ यांच्या कर्तृत्वावर तसेच स्वामी विवेकानंद यांच्या प्रेरणादायी विचारांवर प्रकाश टाकला.व्ही.पी. शैक्षणिक संकुलातील कृषी महाविद्यालयामध्ये जिजाऊ जयंती व युवा दिनानिमित्त स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर आधारित वक्तृत्व तसेच विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी व्ही पी शैक्षणिक संकुलाचे प्रशासकीय अधिकारीवएसबीएनएम फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुरज ननवरे, आर.पी.फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गाझी शेख,एस.पी. पॉलीटेक्निकचे प्राचार्य अमरसिंह कवडे, कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.क्रांतीकुमार पाटील, वेलनेस फिजिओथेरपी कॉलेजच्या प्राचार्य डॉ.पूजा आचार्य, बी.एड. महाविद्यालयाचे प्राचार्य ऋषिकेश लोमटे, डेअरी महाविद्यालयाचे प्राचार्य बालाजी वाघमारे, कृषी महाविद्यालयाचे व्यवस्थापक प्रा.हरी घाडगे, आयटीआयचे व्यवस्थापक प्रा.दत्तात्रय घावटे, लेखापाल योगेश मंडलिक तसेच संकुलातील सर्व महाविद्यालयांचे प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## चंद्रपूरसह ५ जिल्ह्यात राबविण्यात येणार महा पाणलोट प्रकल्प






**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१२, चंद्रपूर :** महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत ॲक्सिस बँक फाऊंडेशन, भारत ग्रामीण जीविका फाऊंडेशन व मनरेगा यांच्यात परस्पर सहकार्याने झालेल्या सामंजस्य करारानंतर राज्यातील चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, नांदेड आणि यवतमाळ या ५ जिल्ह्यामध्ये प्रभावशाली महा पाणलोट प्रकल्प (हाय इम्पॅक्ट मेगा वॉटरशेड प्रकल्प महाराष्ट्र) राबविण्यात येणार आहे.

या प्रकल्पाचा मुख्य उद्देश, ग्रामपंचायतींनाचे बळकटीकरण करून कामांचे नियोजन, संनियंत्रण व अंमलबजावणी करण्याकरीता ग्राम पंचायतीना सहयोग करण्यासाठी भारत ग्रामीण जिविका फाऊंडेशनच्या वतीने १० नागरी सामाजिक संघटनांची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक संघटना दोन तालुक्यांमध्ये काम करणार आहे.

हे प्रकल्प ५ वर्षापर्यंत राबविण्यात येईल. या प्रकल्पाचे उद्दिष्ट २६ तालुक्यांमध्ये एकूण ८७८ मायक्रो वॉटरशेडचा विकास करणे आहे त्याम ध्यमातून ४.३९ लक्ष हेक्टर जमिनीचे उपचार करणे त्याचबरोबर खालील प्रमाणे उद्दिष्टे ठरविण्यात आले आहेत.

१. कमीत कमी एक लक्ष शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करणे,

२. जवळपास १.७७ लक्ष हेक्टर असिंचित जमीन सिंचीत करणे,

३. ८०० ग्रामरोजगार सेवक व ६ हजार बचत गट सदस्यांना जिल्हा नियोजन अहवाल व जिविका प्लॅान्च्या प्रभावी नियोजन व अंमलबजावणी करीता प्रशिक्षण देणे,

४. मृदा व जलसंधारणाच्या व्यवस्थापनाद्वारे जमिनीत ओलावा टिकवून ठेवणे तसेच पावसाच्या पाण्यावर कमी अवलंबून राहणे, बहुपीक प्रणालीला प्रोत्साहन देणे,

५. मनरेगाच्या निधीचा उपयोग करून टिकाऊ व उत्पादक संरचनांची निर्मिती करणे,

६. प्रकल्पाचे यशस्वी व प्रभावीपणे प्रशासकीय नेतृत्वासह संबंधित विभागासोबत अभिसरण करणे.

या अनुषंगाने संबंधित जिल्हांकडून

१) जिल्हास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यास मदत करणे.

२) जिल्हास्तरीय समन्वय समिती निर्मिती व मासिक बैठकांचे आयोजन करण्यास सहकार्य करणे

३) तालुकास्तरीय समन्वय समितीची निर्मिती करणे

४) विविध विभागासोबत समन्वय साधण्याकरीता जसे कृषी विभाग, वन विभाग, जलजीवन मिशन, पशु संवर्धन विभाग, सिंचन विभाग जि.प. व इतर विभागासह जिल्हास्तरावर समन्वय साधण्याकरीता प्रत्येक विभागाचा एक नोडल अधिकारी यांची नियुक्ती करणे. सदर प्रकल्प ५ वर्षामध्ये पूर्ण करायचा असल्यामुळे सर्व विभागासोबत परस्पर सहकार्य आणि समन्वयासाठी जिल्हा प्रशासनाची भूमिका अत्यंत महत्वाची आहे, असे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्राम ीण रोजगार हमी योजनेचे आयुक्त यांनी कळविले आहे.

## तलासरी मधील कुंझे गावात विकासकामांचे भूमिपूजन; रस्त्यांच्या कामांना सुरुवात



**अक्षराज : निलेश कासट**
**दि.१२, तलासरी (पालघर) :** डहाणू विधानसभा मतदारसंघाचे आमदार कॉ.विनोद भिवा निकोले यांच्या विशेष प्रयत्नातून कुंझे गावातील विविध महत्त्वाच्या विकासकामांना अखेर मंजुरी मिळाली असून या कामांचे भूमिपूजन सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता उत्साहात संपन्न झाले. या भूमिपूजनानंतर संबंधित रस्ता कामांना प्रत्यक्ष सुरुवात करण्यात आली.

कुंझे गाव व परिसरातील आदिवासी पाड्यांम धील रस्ते व पायाभूत सुविधांची दुरवस्था लक्षात घेऊन आमदार कॉ.विनोद निकोले यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला होता. पावसाळ्यात रस्त्यांची होणारी चिखलयुक्त अवस्था, विद्यार्थ्यांना आश्रमशाळेत जाण्यास येणाऱ्या अडचणी तसेच शेतकऱ्यांच्या दळणवळणातील समस्या याबाबत ग्रामस्थांकडून वारंवार तक्रारी होत होत्या.

या सर्व बाबी लक्षात घेऊन आमदार निकोले यांनी संबंधित विभागांकडे मागणी लावून धरली होती. त्याचा सकारात्मक परिणाम म्हणून अखेर तीन म हत्वाच्या रस्ता विकासकामांना मंजुरी मिळाली आहे.

**या मंजूर कामांमध्ये**

१) कुंझे कडू पाडा रस्ता तयार करणे,

२) कुंझे बोबापाडा ते वरखंडा आश्रमशाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण,

३) कुंझे बोबापाडा रस्त्याचे डांबरीकरण,

या कामांचा समावेश आहे. या रस्त्यांच्या विकासामुळे कुंझे गाव व परिसरातील आदिवासी पाड्यांचा दळणवळणाचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. शेतमाल वाहतूक सुलभ होणार असून शेतकऱ्यांना बाजारपेठेत पोहोचण्यासाठी मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच दैनंदिन प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना सुरक्षित आणि सोयीस्कर मार्ग उपलब्ध होणार आहे. विशेषतः वरखंडा आश्रमशाळेकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण झाल्याने विद्यार्थ्यांचा सुरक्षित व सुलभ प्रवासाला मोठी मदत होणार असून पालकांमधून समाधान व्यक्त करण्यात येत आहे.

भूमिपूजन कार्यक्रमावेळी माजी उपसभापती कॉ. नंदकुमार हाडळ, कुंझे ग्रामपंचायतीचे सरपंच कॉ. विजय भोये, कॉ. मारिया वाडू, कॉ. सुनिता हाडळ यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आमदार कॉ. विनोद निकोले यांच्या कार्यशैलीचे कौतुक करत गावाच्या विकासासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल आभार मानले.

या विकासकामांमुळे कुंझे गावाच्या सर्वांगीण विकासाला गती मिळणार असून भविष्यात आणखी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न सुरूच राहतील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## भाजपने शहराची वाट लावली - खा.धानोरकरांचा चंद्रपुरात थेट हल्लाबोल



**अक्षराज : वसंत वडस्कर**
**दि.१२, चंद्रपूर :** ज्यांनी आपल्याच पक्षातील उमेदवाराच्या यादीत घोटाळा केला आणि पक्षासोबत गद्दारी केली, ते आपल्याशी किती प्रामाणिक राहतील याचा विचार करण्याची वेळ आली आहे, असा थेट हल्लाबोल काँग्रेस खासदार प्रतिभा धानोरकर यांनी भाजपवर केला.चंद्रपूर महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने संजयनगर, भानापेठ व तुकुम परिसरात आयोजित प्रचारसभांमध्ये त्या बोलत होत्या.

महानगरपालिकेत १० वर्षे सत्ता भोगल्यानंतरही जर रस्ते, पाणी आणि स्वच्छतेसारख्या समस्या कायम राहत असतील तर अशा सत्ताधाऱ्यांचा काय फायदा? असा सवाल करत त्यांनी मतदारांना भाजपच्या अपयशाचा जाब विचारण्याचे आवाहन केले.

शहरातील 'अमृत' योजनेवर बोलतांना त्या म्हणाल्या की, केंद्राची 'अमृत' सारखी मोठी योजना शहरात आली खरी, पण ती केवळ कागदावरच राहिली. योजना अपूर्ण असताना आणि घरांपर्यंत अद्याप पाणी पोहोचलेले नसतानाही, केवळ 'टक्केवारी' च्या हव्यासापोटी सत्ताधाऱ्यांनी कंत्राटदारांची बिले काढून दिली. सर्वसामान्यांच्या पैशाचा हा अपव्यय असून भाजपला जनतेच्या प्रश्नांशी काहीही देणे-घेणे उरलेले नाही.

चंद्रपूरच्या पाणी प्रश्नावर बोलतांना खासदार प्रतिभा धानोरकर यांनी भविष्यातील संकल्प मांडला. प्रस्तावित 'धानोरा बॅरेज' प्रकल्प मंजूर करुन चंद्रपूर शहराला २४ तास पिण्याचे पाणी उपलब्ध करुन देणे ही आपली प्राथमिकता असल्याचे त्यांनी सांगितले.

काँग्रेसने नेहमीच निराधार नागरिकांना स्थायी घरे देण्याचे काम केले असून, संजयनगर, एमईएल प्रभाग सारख्या भागातील नागरिकांच्या हक्कासाठी पक्ष सदैव खंबीरपणे उभा राहील, अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

या प्रचारसभांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी माजी शिक्षणमंत्री वसंत पुरके यांनीही केंद्र, राज्य आणि स्थानिक भाजप नेत्यांच्या धोरणांवर सडकून टीका केली. याप्रसंगी माजी आ.सुभाष धोटे, काँग्रेस सरचिटणीस विनोद दत्तात्रय यांच्यासह पक्षाचे विविध पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते. चंद्रपूरच्या सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन यावेळी सर्व नेत्यांनी एकमुखाने केले.

### ग्रामीण रुग्णालय मनोर येथे राजमाता जिजाऊ जयंती साजरी



**अक्षराज : विनायक भोईर**
**दि.१२, पालघर :** सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी ग्रामीण रुग्णालय मनोर, ता.जि.पालघर येथे राजमाता जिजाऊ मा.साहेब भोसले यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास वैद्यकीय अधिकारी डॉ.साजल, सहाय्यक अधीक्षक विष्णू सांबारे, आरोग्य समिती सदस्य विनायक भोईर, प्र.शा.वै.अधिकारी विजय पाटील, क्ष.की.वै.अधिकारी कपिल निकुम, औषध नि.अधिकारी दिक्षा, ऑप्थाल्मिक सहाय्यक पूजा, स्टाफ नर्स दिपाली, उज्वला, माधुरी, सिक्युरिटी पाटील, कक्ष सेवक ज्ञानेश्वर, गुरुनाथ, गीताबाई साक्षी भोईर आदी मान्यवर व कर्मचारी उपस्थित होते.

### सर्वजित पोळ यांना वाद्यनिर्मिती क्षेत्रातील राज्य शासनाचा युवा सांस्कृतिक पुरस्कार प्रदान



**अक्षराज : जे.के.पोळ**
**दि.११, मुंबई :** राज्य सरकारच्या सांस्कृतिक कार्य विभागामार्फत जाहीर करण्यात आलेल्या राज्य सांस्कृतिक पुरस्कार वितरण सोहळ्यात पेठवडगाव (जि.कोल्हापूर) येथील सर्वजित विष्णू पोळ यांना वाद्यनिर्मिती क्षेत्रातील राज्य युवा सांस्कृतिक पुरस्कार प्रदान करण्यात आला. १ लाख रुपये रोख व सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे.

मुंबई येथे झालेल्या या सोहळ्यात सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड.आशिष शेलार यांच्या हस्ते शासनाच्या सांस्कृतिक विभागाचे सचिव डॉ.किरण कुलकर्णी यांच्या उपस्थितीत सर्वजित पोळ यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ज्येष्ठ अभिनेते अरुण कदम, चित्रपट निर्माते शिवाजी लोटन पाटील, गायक राहुल देशपांडे, भाग्येश मराठे, अभिनेत्री तेजश्री प्रधान, अभिनेता भूषण कडू यांना विविध विभागांतील पुरस्कार प्रदान करण्यात आले.

# नवी मुंबईत शाळा क्रमांक ४० येथे मतदार जनजागृती अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**

**दि.१२, नवी मुंबई :** नवी मुंबई महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुका २०२५ अंतर्गत मतदारांमध्ये जनजागृती निर्माण होण्यासाठी सर्व माध्यम सर्व व्यवस्थापन सर्व बोर्डाच्या प्राथमिक, माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये SVEEP (Systematic Voters' Education and Electoral Participation) अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्याची सूचना शिक्षण विभाग नवी मुंबई महापालिका व सन्माननीय आयुक्त तथा निवडणूक अधिकारी यांचे मार्फत करण्यात आली होती. या अंतर्गत नवी मुंबई महापालिका शाळा क्रमांक ४० महापे यांच्यामार्फत आज जनजागृती प्रभात फेरीचे आयोजन करण्यात आले.

सदर फेरीमध्ये शाळेतील पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला मतदार राजा जागा हो लोकशाहीचा धागा हो, ना जातींवर ना धर्मावर बटन दाबा कार्यावर, सुजाण मतदार लोकशाहीचा आधार, मतदान कधी १५ जानेवारी, चला चला मतदान करू लोकशाहीला बळकट करू, यासारख्या विविध घोषणांनी संपूर्ण महापे परिसर दुमदुमून गेला.

शाळेतील विद्यार्थ्यांची रॅली महापे गावातील राम मंदिर, गावदेवी वाडी, जुने आरोग्य केंद्र, मिलेनियम बिझनेस पार्क, हॉटेल आशीर्वाद, महापे बस डेपो, महापे पेट्रोल पंप व महापे शील फाटा रोड मार्गे परत शाळेमध्ये आले. यावेळी शाळेतील पाचवी ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी विश्रांती चांगण यांच्या मार्गदर्शनाखाली तयार केलेले मतदार जागृती पथनाट्य रस्त्यावर व गल्लोगल्ली सादर करण्यात आले. त्यामध्ये मतदारांना कोणत्याही भूलथापांना बळी न पडता निर्भीडपणे आणि जागरूकपणे मतदान करण्याचे आवाहन करण्यात आले. शाळेमध्ये मतदार जागृती बद्दल चित्रकला व रांगोळी स्पर्धांचे देखील आयोजित करण्यात आले होते.



विद्यार्थ्यांनी विविध प्रकारच्या आकर्षक अशा रांगोळीने शालेय परिषद आकर्षक करून टाकला होता. तसेच विद्यार्थ्यांसाठी चारोळ्या व घोषवाक्य पर आधारित स्पर्धांचे देखील आयोजन करण्यात आले होते. यात विद्यार्थ्यांनी स्वरचित तसेच उपलब्ध असलेल्या मतदार जनजागृती बद्दलच्या घोषवाक्याचे सुंदर लेखन केले.

सदर मोहिमेअंतर्गत विद्यार्थ्यांना मतदार जागृतीची प्रतिज्ञा देखील देण्यात आली तर सदर उपक्रम पालकांपर्यंत पोहोचवण्यासाठी आणि पालकांना १०० टक्के मतदान करण्यासाठी संकल्प पत्र देखील देण्यात आली. सदर विविध स्पर्धांच्या आयोजनशाळेचे उपक्रमशील मुख्याध्यापक मारुती गवळी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रीती भंडारे, रीना फुलपगारे, दत्तात्रेय भांबळे, राहुल जाधव स्वाती कोर रूपाली घोडके अंजली आग दिघे विश्रांती चांगण, या शिक्षकांनी आणि धर्मेश कोळी, अनिल तांबे, अनिता देवकर, महेश पाटील, मंदा लोंढे, जनार्दन म्हात्रे या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी यांनी विशेष मेहनत घेतली. सदर कार्यक्रमाचे आयोजनासाठी या उपक्रमांचे समन्वयक पीएम श्री राजश्री शाहू महाराज विद्यालय चे कमलेश इंगळे यांचे विशेष सहकार्य लाभले शाळेच्या या लोकशाही बळकट करणाऱ्या उपक्रमांचे ग्रामस्थ कडून विशेष कौतुक करण्यात येत आहे.

# मुंबई लोकलच्या डब्यातच महिला प्रसूती; धावत्या गाडीत गुंजला नवजात बाळाचा आवाज

**अक्षराज : संजय पंडित**

**दि.१२, अंबरनाथ (ठाणे) :** मुंबईची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या लोकल ट्रेनमध्ये दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी रात्री एक विलक्षण आणि हृदयस्पर्शी घटना घडली. रात्रीच्या वेळी प्रवास करणाऱ्या एका २३ वर्षीय गर्भवती महिलेला अचानक प्रसूती कळा सुरू झाल्या. रेल्वे डब्यात भीती आणि गोंधळाचे वातावरण असताना रेल्वे सुरक्षा बलाच्या (आरपीएफ) एका महिला पोलीस उपनिरीक्षकाने दाखवलेल्या समय सूचकतेमुळे धावत्या ट्रेनचा डबाच जणू 'प्रसूती कक्ष' बनला.

या महिलेने एका गोंडस मुलीला जन्म दिला असून माय-लेक सुखरूप आहेत.या घटनेबाबत सविस्तर वृत्त असे आहे की, अंबरनाथमध्ये राहणारी अंजू काळे ही २३ वर्षीय महिला काही वैयक्तिक कामानिमित्त कल्याणला गेली होती. रात्री ८ च्या सुमारास ती अंबरनाथला येण्यासाठी लोकलमध्ये चढली. लोकलने प्रवास करत असताना अचानक तिला तीव्र प्रसूती वेदना सुरू झाल्या. वेदनांनी विव्हळणाऱ्या अंजू यांना पाहून डब्यातील इतर प्रवाशांच्या काळजात धस्स झाले. काय करावे, हे कोणालाही सुचत नव्हते. रात्री ८ वाजून ५ मिनिटांनी लोकल अंबरनाथ स्थानकाच्या प्लॅटफॉर्मवर दाखल झाली. गाडी थांबताच काही प्रवाशांनी तातडीने स्थानकावरील आरपीएफ कार्यालय गाठले आणि घडल्या प्रकाराची माहिती दिली.

माहिती मिळताच ऑन ड्युटी असलेल्या महिला पोलीस उपनिरीक्षक सोनाली नन्देश्वर यांनी क्षणाचाही विलंब न लावता तातडीने संबंधित लोकल डब्याकडे धाव घेतली. परिस्थिती हाताबाहेर जात असल्याचे पाहून त्यांनी अत्यंत शांतपणे आणि धैर्याने निर्णय घेतले. त्यांनी तातडीने डब्यातील सर्व पुरुष प्रवाशांना खाली उतरवले. डब्याचे दोन्ही दरवाजे बंद करून घेण्यात आले. महिला प्रवाशांच्या मदतीने चादर आणि उपलब्ध कापडांचा वापर करून प्रसूतीसाठी सुरक्षित आडोसा तयार केला. उपनिरीक्षक सोनाली नन्देश्वर आणि उपस्थित महिला प्रवाशांच्या मदतीने अंजू काळे यांची सुरक्षित प्रसूती पार पडली. काही वेळातच डब्यातून नवजात बाळाच्या रडण्याचा आवाज आला आणि स्थानकावर चिंतेत असलेल्या प्रवाशांच्या चेहऱ्यावर आनंदाचे हसू उमटले. अंजू यांनी एका गोंडस मुलीला जन्म दिला होता. दरम्यान प्रसूतीनंतर रेल्वे प्रशासनाने तातडीने रुग्णवाहिका पाचारण केली. आई आणि नवजात बाळाला तातडीने अंबरनाथमधील छाया रुग्णालयात हलवण्यात आले. रुग्णालयातील डॉक्टरांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रसूती सुखरूप झाली असून माय-लेक दोघींचीही प्रकृती सध्या स्थिर आहे. महिला पोलीस उपनिरीक्षक सोनाली नन्देश्वर यांनी दाखवलेले धाडस आणि समयसूचकतेचे प्रवाशांकडून तसेच सोशल मीडियावर सर्वत्र कौतुक होत आहे.

# बऱ्हाणपूर येथे वनविभागाची खैर तस्करांवर मोठी कारवाई; खैरांचा मोठा साठा जप्त

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.१२, पालघर :** सोमटा वनपरिममंडळातील बऱ्हाणपूर गावाच्या हद्दीत वनविभागाच्या पथकाने दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी रात्री केलेल्या कारवाईत खैराचे सोलीव ओंडके जप्त करण्यात आले. जप्त केलेले ३० ते ३५ सोलीव ओंडक्यांचे वजन एक टन असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली. याप्रकरणी अज्ञात आरोपी विरोधात वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

बऱ्हाणपूर गावाच्या हद्दीतून दिनांक ०९ जानेवारी २०२६ रोजी रात्री खैराची तस्करी होणार असल्याची माहिती सोमटा राउंड मधील वनरक्षक अर्चना म्हस्कर यांना मिळाली होती. माहिती नुसार नांदगाव राउंडचे वनपाल आणि वनरक्षकांना सोबत घेत बऱ्हाणपूर गावाच्या हद्दीत सापळा रचला होता. वनविभागाच्या सापळ्याची चाहूल लागताच खैर तस्कर खैराचे ओंडके जागेवर सोडून पळून गेले. त्यानंतर वनविभागाच्या कर्मचाऱ्यांनी ग्रामस्थांना सोबत घेत खैराच्या ओंडक्यांचा शोध सुरू केला. काही वेळात एका पडीक ठिकाणी खैराचे सोलीव ओंडके आढळून आले. ३० ते ३५ ओंडके जप्त करण्यात आले.खैर कत्तल आणि तस्करी प्रकरणी मनोर वनपरीक्षेत्र कार्यालयात अज्ञात आरोपी विरोधात वनअधिनियमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वनविभागाकडून आरोपीचा शोध सुरु करण्यात आला आहे.



कारवाई वनपाल नांदगाव वनपरिमंडळाचे वनपाल प्रभव भोई, वनरक्षक अर्चना मस्कर, जितेश भरसट यांच्या पथकाने केली. वनविभागाच्या पथकाला कारवाईसाठी बऱ्हाणपूर गावातील ग्रामस्थांचे सहकार्य मिळाले.

# राष्ट्रीय सब-ज्युनिअर तायक्वाँदो स्पर्धेसाठी उपनगरच्या अनन्या कामत, निधी भंडारी यांची निवड





**अक्षराज : संदिप येवले**

**दि.१२, मुंबई :** तायक्वॉंदो फेडरेशन ऑफ इंडिया ही तायक्वांदो खेळाची भारतातील एकमेव शिखर संघटना आहे. या संघटनेला इंडियन ऑलिंपिक व भारत सरकारच्या क्रीडा मंत्रालयाने मान्यता दिलेली असून महाराष्ट्रामध्ये तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र (मुंबई) या अधिकृत राज्य संघटनेने सिंधुदुर्ग येथे झालेल्या सब-ज्युनिअर राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन केले होते. या सब-ज्युनियर राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये मुंबई उपनगरच्या अनन्या कामत (क्योरोगी) व निधी भंडारी (पुमसे) मध्ये आपल्या उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत सुवर्णपदक पटकावले.

१३ ते १५ जानेवारी २०२६ तालकोतरा इनडोअर स्टेडियम दिल्ली येथे होणाऱ्या सब-ज्युनिअर राष्ट्रीय तायक्वॉंदो स्पर्धेसाठी अनन्या व निधी यांची निवड झालेली असून या निवड झालेल्या खेळाडूंना व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या प्रशिक्षकांचे रॉबिन मेंझेस, यश जाधव यांचे तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ सबर्बन मुंबई या संघटनेच्या सर्व पदाधिकारी तसेच तायक्वॉंदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र,मुंबई या संघटनेचे अध्यक्ष अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पठारे, सचिव सुभाष पाटील, खजिनदार व्यंकटेश कररा, प्रवीण बोरसे, निरज बोरसे, अजित घारगे, सतीश खेमसकर या सर्वांनी खेळाडूंचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

# जानकाई विद्यालयात राजमाता जिजाऊ जयंती आणि स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात संपन्न



**अक्षराज : दिपक शिवले**

**दि.१२, कळवण (नाशिक) :** कळवण येथील जानकाई प्राथमिक व माध्यमिक विद्यालय या विद्यालयात स्वराज्य जननी राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ माँ साहेब आणि युवकांचे प्रेरणास्थान स्वामी विवेकानंद यांची जयंतीचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक एम.बी.जोशी होते. रुतुजा सावंत हिने राजमाता जिजाऊ तर श्लोक पाटील याने स्वामी विवेकानंद यांची भूमिका साकारली होती.

कार्यक्रमाप्रसंगी राजमाता जिजाऊ वंदना नृत्य सादर करण्यात आले. तसेच स्वामी विवेकानंद स्मृती गीत गायन झाले. खुशाल शिरसाठ प्रिया भोये आणि अंकित वाघ यांनी विद्यार्थी मनोगतातून माहिती दिली. शिक्षक मनोगत मराठी विषय शिक्षक राहुल सोनवणे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इ. १० वीच्या विद्यार्थीनी आराध्या आहेर आणि भार्वी भावसार यांनी केले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षिका आणि शिक्षकेतर कर्मचारी यांनी मोलाचे मार्गदर्शन केले.

# थोडक्यात

## जैविक आणि सेंद्रिय शेतीच्या माध्यमातून शाश्वत विकास होईल - वृक्षमित्र मुगटकर




**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.१२, पालम (परभणी) :** देशात भविष्यातील पिढींना सुखकर जगण्यासाठी रासायनिक शेतीचा त्याग करून आपण जैविक आणि सेंद्रिय शेतीचा अवलंब केलातर देशाचा शाश्वत विकास होईल. मानव जात आजारापासून मुक्त होईल. त्यामुळे सुखी जगण्यासाठी आपण शाश्वत शेतीकडे वळले पाहिजे असे प्रतिपादन वृक्षमित्र संतोष मुगटकर यांनी दिनांक ११ जानेवारी २०२६ रोजी केले. ते तालुक्यातील जांभूळबेट येथे माधवराव पाटील महाविद्यालय पालमच्या समाजशास्त्र व रसायनशास्त्र विभागाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या शेतकरी मेळाव्यात मार्गदर्शन करताना बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रगतिशील शेतकरी प्रकाश नाना सिरस्कार हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून कृषीभूषण कांतराव झरीकर, प्राचार्य डॉ.आत्माराम आरसुळे, डॉ. नानासाहेब पाटील यांची मंचावर उपस्थित होती. या कार्यक्रमात तालुक्यातून आलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना मुगटकर म्हणाले की, भविष्यकाळ हा मानव जातीसाठी चांगला नाही कारण रासायनिक खते आणि औषधांच्या अतिवापरातून भयंकर आजार मानव आणि पशु पक्षांमध्ये पसरत आहेत .त्यामुळे भविष्यातील पिढ्यांना निरोगी जगवायचे असेल तर आपल्याला शाश्वत शेतीचा मार्ग पकडावाच लागेल. यावेळी प्राचार्य डॉ.आरसुळे मार्गदर्शन करताना म्हणाले की, शाश्वत शेतीच्या विकासाचा मार्ग म्हणून जैव रसायन निर्माण करणे आणि त्याचा उपयोग करणे काळाची गरज आहे. त्यासाठी सर्वांनी प्रशिक्षित होऊन आरोग्यदायी शेती करावी असे आवाहन केले. या कार्यक्रमाचे प्रस्ताविक समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ.नानासाहेब पाटील यांनी केले.

## विंचूर येथे अबॅकसच्या राज्य पातळीवर विद्यार्थ्यांचा गुणगौरव संपन्न




**अक्षराज : सुनिल क्षिरसागर**

**दि.१२, विंचूर (नाशिक) :** विंचूर येथील श्री स्वामी समर्थ अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी अबॅकस परीक्षेत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. संस्थेच्या ५० विद्यार्थ्यांची राज्यस्तरीय परीक्षेसाठी निवड झाल्याबद्दल त्यांचा भव्य गुणगौरव सोहळा विंचूर येथील वेदांत हॉटेलमध्ये मोठ्या उत्साहात पार पडला. 'आय जिनिअस' तर्फे सप्टेंबर २०२५ मध्ये राष्ट्रस्तरीय, राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय अबॅकस परीक्षा आयोजित करण्यात आली होती. या परीक्षेमध्ये श्री स्वामी समर्थ अकॅडमी, विंचूरचे एकूण ५० विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. विशेष अभिमानाची बाब म्हणजे, या सर्व ५० विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळवत पुढील राज्यस्तरीय अबॅकस परीक्षेसाठी पात्रता सिद्ध केली आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ट्रॉफी, प्रमाणपत्र व मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी लासलगाव पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक (PSI) मोहन पाटील, नांदुर्डी येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक जनता विद्यालयाचे प्राचार्य भाऊसाहेब दगूजी म्हसकर, देवेंद्र अजित दराडे- उपप्राचार्य एस.एन.जे.बी नेमिनाथ नगर चांदवड, संग्राम राजाराम सानप अध्यक्ष सायन्स टीचर्स असोसिएशन येवला हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. आणि पत्रकार सुनिल क्षिरसागर, अभय पाटील, रोहन सरोदे आदी मान्यवरही उपस्थित होते. प्रारंभी आयोजकांच्या वतीने सर्व पाहुण्यांचा शाल, गुलाब पुष्प व भेटवस्तू म्हणून पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक कौशल्याचे कौतुक केले आणि त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन सचिन कामडी व मोनाली कामडी यांनी केले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन काजल शिंदे आणि आभारप्रदर्शन मोनाली कामडी यांनी केले. यावेळी पालकांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाज्योती येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती साजरी

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१२, ठाणे :** राजमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांसारखा आदर्श राजा घडवून स्वराज्याची पायाभरणी केली, तर स्वामी विवेकानंद यांनी संपूर्ण तरुणाईला आत्मविश्वास, राष्ट्रभक्ती आणि मानवतेचा संदेश दिला. या दोन्ही महापुरुषांचे विचार आजच्या पिढीने अंगीकारले तरच सक्षम समाज आणि सशक्त राष्ट्र उभे राहील, असे प्रभावी प्रतिपादन 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी केले. महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर येथे सोमवार, दिनांक १२ जानेवारी २०२६ रोजी राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. त्यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाची सुरुवात मिलिंद नारिंगे यांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादनाने झाली. यावेळी 'महाज्योती'चे मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रशांत वावगे आणि लेखाधिकारी रश्मी तेलेवार यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मार्गदर्शन करताना नारिंगे यांनी राजमाता जिजाऊ यांच्या मातृत्वाला राष्ट्रनिर्मितीचे अधिष्ठान असल्याचे सांगितले. राजमाता जिजाऊ या केवळ शिवाजी महाराजांच्या माता नव्हत्या, तर त्या स्वराज्याच्या संकल्पनेच्या शिल्पकार होत्या. त्यांनी शिवरायांमध्ये लहानपणापासूनच राष्ट्रप्रेम, न्याय, शिस्त आणि लोककल्याणाची मूल्ये रुजवली, असे त्यांनी नमूद केले. स्वामी विवेकानंद यांच्या विचारांवर भाष्य करताना मिलिंद नारिंगे म्हणाले की, स्वामी विवेकानंद यांनी भारतीय तरुणाईला आत्मविश्वास, आत्मभान आणि राष्ट्रभक्तीचा मंत्र दिला.

'उठा, जागे व्हा आणि ध्येय साध्य होईपर्यंत थांबू नका' हा त्यांचा संदेश आजही युवकांसाठी प्रेरणादायी आहे. युवकांनी केवळ नोकरीपुरते शिक्षण न घेता समाजपरिवर्तनाची जबाबदारी स्वीकारावी, असे आवाहनही त्यांनी केले. शिक्षण हे सामाजिक परिवर्तनाचे सर्वात प्रभावी साधन असून चारित्र्यनिर्मिती, समता आणि मानवतेचे मूल्य अंगीकारल्यासच राष्ट्र सशक्त बनेल, असे मत त्यांनी व्यक्त केले. राजमाता जिजाऊ यांचे संस्कारक्षम मातृत्व आणि स्वामी विवेकानंद यांचे विचारशील तत्त्वज्ञान हे आजच्या पिढीसाठी दिशादर्शक असल्याचेही मिलिंद नारिंगे यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही दोन्ही महापुरुषांच्या कार्याचा गौरव केला.